जा.क्रं.नावाशमनपा/आस्था-सेल/ ९०९४ /२०१३
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक:- ०८.०३.२०१३

## अपंग अनुशेष भरती
## ( दुसरी वेळ )

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड आस्थापने वरील अपंगाचा शिल्लक अनुशेष खालील पदे भरुन काढण्यासाठी यापुर्वी जाहीरात देवुन अर्ज मागविण्यात आले होते. सदरील जाहीरातीनुसार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** या पदासाठी केवळ तीन उमेदवार पात्र ठरले आहेत. सदरची यादी मनपाकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईडवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तथापि **`` वैद्यकिय अधिकारी-१, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)-१ व परिचारीका-१ ``** या पदासाठी दुसऱ्यांदा खालील प्रमाणे जाहीरात देण्यात येवुन इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन विहित मुदतीत / नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **अर्ज स्विकारण्याचे दिनांक,<br>वेळ<br>व ठिकाण** | दिनांक **११ /०३/२०१३** ते **३० /०३ /२०१३** पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन)<br>( कार्यालयीन वेळेत )<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची नविन प्रशासकिय इमारतीत पहिल्या मजल्यावर एक खिडकी कक्षात ( आवक विभाग ) स्विकारण्यात येतील.<br>**टिप :-** मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही. |

| अ. क्रं | पदाचे नांव | पद संख्या | वेतन श्रेणी | आरक्षणाचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | **वैद्यकिय अधिकारी** | १ | ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे | अस्थीव्यंग एका पायाने ( O.L.) | **अ)** मान्यता प्राप्त विद्यापीठाची **एम.बी.बी.एस., एम.डी. (मेडीसीन)** किंवा समकक्ष पदवी.<br>**ब)** शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील संबंधीत विषयातील ३ वर्षाचा अनुभव |
| २ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | १ | ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे | अस्थीव्यंग एका पायाने ( O.L.) | **अ)** मान्यता प्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदविका व ३ वर्षाचा संबंधीत कामाचा अनुभव. किंवा स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण. |
| ३ | **परिचारीका** | १ | ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे | अस्थीव्यंग एका पायाने ( O.L.) | **अ)** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी परीक्षा उत्तीर्ण **आणि**<br>**ब)** परिचारीका या पदासाठी 18 महिन्यांचा प्रशिक्षण कोर्स पुर्ण असणे आवश्यक आहे **आणि**<br>**क)** महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. |

**टिप :-** यापुर्वीच्या जाहीरातीनुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी ज्यांचे अर्ज पात्र ठरले आहेत अशा उमेदवारांनी नव्याने अर्ज करण्याची आवश्यक्ता नाही.

१. उमेदवारांने A-4 साईजच्या जाड पांढऱ्या कागदावर सोबत दिलेल्या विहित नमुण्या मधील अर्ज सादर करावा. अर्ज टंकलेखीत अथवा संगणकीकृत करुन अथवा स्वत:च्या अक्षरात भरलेला व वाचनिय असावा.

२. **अर्जासोबत जाहिरातीत विहित केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे अनिवार्य राहील. मुळ प्रमाणपत्र जोडू नयेत.**

३. उमेदवारांने अर्जावर अलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो चिटकवून, फोटोवर उमेदवारांनी स्वत:ची स्वाक्षरी करावी. **तसेच उमेदवारानी अर्जासोबत दोन (२) जास्तीच्या फोटो देवुन फोटोच्या मागे आपले नांव व पत्ता लिहावा.**

४. उमेदवारास लेखीपरिक्षा व मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.व त्या बाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येणार नाही.

५. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांने चुकीची माहिती / प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर केल्याचे / दिशाभुल केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल.

६. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र / अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७. सदरील भरतीस शासन निर्णय / परिपत्रके लागु राहतील.

८. **निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता स्थगीत/रद्द अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखून ठेवले आहेत.**

९. **उमेदवारांने अर्जा सोबत राष्ट्रीयकृत बँकेचा खुल्या प्रवर्गासाठी रु. २००/- (अक्षरी रुपये दोनशे) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर) चा डि. डि. `` Commissioner Nanded Waghala City Municipal Corporation Nanded `` या नावाने जोडणे बंधनकारक राहील जे उमेदवार अर्जा सोबत डि.डी. जोडणार नाही त्यांचे अर्ज स्विकारले जाणार नाही..**

१०. **उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवडी संबधात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधीतास अपात्र ठरविण्यात येईल / निवड रद्द करण्यात येईल.**

११. उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास सदर नोंदणी कार्डची साक्षांकित प्रत अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील.

**१२. प्राप्त अर्जाच्या छाणनीनंतर लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी मनपाकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईडवर प्रसिध्द करण्यात येईल लेखी परिक्षा व तोंडी मुलाखतीचा तपशील अर्जदारांना नंतर कळविण्यात येतील.**

<u>निवड यादी:-</u>

१. **सदरची निवड यादी एक वर्षा पर्यंत अस्तित्वात राहील.**

<u>इतर अटी व शर्ती:-</u>

१. <u>**वयोमर्यादा :-**</u> महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. अपंग-१००१/६१/प्र.क्र.३६/२००२/ १६-३ दिनांक १०.०५.२००२ अन्वये अपंग व्यक्तींना गट अ ते गट ड मधील पदावर सरळ सेवेने नियुक्ती देण्या संदर्भात उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षा पर्यंत शिथील करण्यात आली आहे. तसेच अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम २ (टी) नुसार अपंग व्यक्तीचे अपंगत्व किमान ४०% असणे आवश्यक आहे. तसेच अंशकालीन, प्रकल्पग्रस्त व खेडाळु ई. उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासनाच्या नियमानुसार राहील

२. उमेदवाराचे जाहीरातीच्या दिनांकास वय शासन निर्णयानुसार ४५ वर्षाच्या आत असणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब मंत्रालय मुंबई दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदीनुसार आरक्षीत पदावर निवड झालेल्या उमेदवारास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासनी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोंच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील. अशा उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांका पासुन ६ महिण्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल.

४. शासन परिपत्रक क्रं. सीबीसी/१०/२००६/प्रक्र.१५/मावक-५ दि. ५ जुन २००६ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनी उन्नत व प्रगतगटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलियर) सालसन २०११-२०१२ चे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. वरील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेले असणे आवश्यक आहे.

५. महाराष्ट्र शासन नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ अन्वये विहित उमेदवारांनी त्यांचे दिनांक २८.३.२००५ अन्वये रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या याबाबत विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

**६.** वयाकरीता शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शालांत (एसएससी) प्रमाणपत्र, सादर करणे आवश्यक राहील. संगणक अर्हताधारक / MSCIT धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

७. उमेदवारांस कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करावा लागेल.

८. अर्जासोबत जाहीरातीत नमुद शैक्षणिक अर्हता, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शालांत (एसएससी) प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, इत्यादी आवश्यकत्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेले असणे बंधनकारक आहे.

९. उमेदवार **महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा व त्याबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याकडील प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत अर्जा सोबत जोडणे** अनिवार्य राहील.

१०. **माजी सैनिक उमेदवारा** करिता शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दिनांक १० ऑक्टोंबर १९८० व दिनांक १६ एप्रिल १९८१ नुसार शासन सेवे करिता पात्र राहील.

११. **खेळाडूच्या** व्यक्तीगत अथवा सांघीक क्रिडा स्पर्धा मध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय, अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण/रौप्य किंवा कास्यपदक प्राप्त करणारा खेळाडू, राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळाचा महाराष्ट्र ऑलाम्पीक असोसिएशनसी सलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजीत केलेल्या असाव्यात अथवा ऑलाम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजीत केलेल्या असाव्यात किमान प्राविण्यापेक्षा उच्चस्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. व्यक्तीगत रित्या किंवा आमंत्रीत स्वरुपाच्या स्पर्धा मध्ये भाग घेतलेल्या खेळाडूचा विचार करता येणार नाही.

**१२. वरील सर्व पदांसाठी परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षाचा राहील प्रथम वर्षाची सेवा समाधानकारक असल्यासच दुसऱ्या वर्षाची मुदतवाढ देण्यात येईल. काम समाधानकारक नसल्यास सेवेतुन कमी करण्यात येईल.**

१३. अंशकालीन उमेदवारांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणीची साक्षांकित प्रत प्रवेशपत्रा सोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच समांतर आरक्षणातील उमेदवारांनी समांतर आरक्षणा बाबतचा पुरावा प्रवेश पत्रा सोबत जोडणे आवश्यक राहील.

१४. जाहिरातीमधील भरावयांच्या पदांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. त्यासाठी सक्षम प्रधिकाऱ्याकडील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती (साक्षांकित) देणे बंधनकारक राहील.

१५. जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणात बदल होऊ शकतो.

१६. निवड प्रक्रियतील किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी चुकीची माहिती / प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याची निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल, तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

**१७.** उमेदवारांनी अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली. म्हणजे लेखी परीक्षेस / तोंडी मुलाखतीस पात्र असल्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे असणार नाही.

**१८.** शासकिय / निमशासकिय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या परवानगीने अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच अर्जा सोबत परवानगी पत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

**१९. ज्या उमेदवाराची निवड होईल अशा उमेदवारांनी नियुक्ती पुर्वी संबंधित जिल्हयाचे पोलिस अधिक्षक यांचेकडून चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

**२०. ज्या उमेदवाराची निवड होईल अशा उमेदवारांनी नियुक्ती पुर्वी मा. अध्यक्ष वैद्यकिय मंडळ, जिल्हा शल्य चिकीत्सक,** डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री गुरु गोबिंदसिंघजी स्मारक रुग्णालय, नांदेड. **यांचेकडून** शासकीय सेवे करीता शारीरिक पात्रता विषयक तपासणी **प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

२१. शासन वित्त विभाग निर्णय क्रं. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दि. ३१.१०.२००५ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नविन परिभाषीत अशंदान निवृत्ती योजना लागू राहील. या शिवाय संबंधीतांना सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२२. परिचारीका या पदासाठी उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस व अनभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

**२३. जाहीरातीत दिल्यानुसार सर्व कागदपत्रांसह अर्ज सादर केल्यासच अर्ज स्विकारले जातील. अपुर्ण कागदपत्र असलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

**२४. ज्या उमेदवाराची निवड होईल अशा उमेदवारांनी नियुक्ती पुर्वी संबंधित जिल्हयाचे पोलिस अधिक्षक यांचेकडून चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र, वैद्यकिय मंडळाकडुन अपंगत्वाचे ४०% अपंग असल्याचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

२५. सदर जाहिरात व अर्जाचा नमुना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड च्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध आहे त्याचा पत्ता **www.nwcmc.gov.in** असा आहे.

२६. **खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील.**

१) अर्जाच्या तारखेस विहित शैक्षणिक अर्हता / पात्रता / वय धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज.
२) अपुर्ण /चुकीचे / खडाखोड केलेले / अर्जा सोबत नमुद रक्कमेचा डि. डि. न जोडलेले / उमेदवाराची स्वाक्षरी नसलेले अर्ज.
३) आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज.
४) कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र विहित नमुण्यात न भरलेला अर्ज.
५) महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज.
६) उमेदवाराचा अर्ज कोणत्याही त्रुटीमुळे रद्द झाल्यास त्या बाबत कोणतीही दखल घेतली जाणार नाही अथवा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

**टिपः-** अनुक्रमांक १ वरील **वैद्यकिय अधिकारी** या अभिनामाचे पद दिनांक ३१.०३.२०१३ रोजी सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार असल्यामुळे सदरील पदावर निवड झालेल्या उमेदवारास वरील नमुद तारखे नंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**स्वाक्षरीत/-**
**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड **करिता/-**

**प्रतः-** मनपाकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईडवर प्रसिध्द करण्यात येते.

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**
**(अपंग अनुशेष अंतर्गत दुसरी वेळ)**
**---------------------------------------- या पदासाठी अर्ज**

उमेदवाराचा अलीकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वत:च्या स्वाक्षरीसह

**प्रति**
**मा. आयुक्त,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड.

**विषय :- --------------** पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत.
संदर्भ :- दैनिक---------------------- वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात

उपरोक्त जाहीरातीच्या संबधाने मी, --------------------- या पदासाठी अर्ज सादर करीत आहे व त्याची आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव : ---------------------------------------------------------------
मराठी मध्ये ( आडनांव प्रथम) ----------------------------------------------------------------
**इंग्रजी मध्ये**
(SURNAME FIRST) ----------------------------------------------------------------
(CAPITAL LETTER) ----------------------------------------------------------------

२. पत्र व्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता ----------------------------------------------------------------
**मराठी मध्ये** ----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------
**इंग्रजी मध्ये** (CAPITAL LETTER) ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------

३. कायमचा संपूर्ण पत्ता **(मराठी मध्ये)** ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------

कायमचा संपूर्ण पत्ता **(इंग्रजी मध्ये)** ----------------------------------------------------------------
(CAPITAL LETTER) ----------------------------------------------------------------
**मोबाईल नं.** ------------------- PIN CODE NO.-----------------

४. जात / पोटजात (असल्यास) ----------------------------------------------------------------
५. **जातीचा प्रवर्ग** ----------------------------------------------------------------

६. **Commissioner Nanded Waghala City Municipal Corporation Nanded** या नावाने राष्ट्रीयकृत बॅंकेचा डि.डि. जोडावा.
बॅंकेचे नांव --------------------------------------------------
डि.डि. क्रं.--------------- दिनांक ------------- रुपये ------------

७. जन्म तारीख (अंकात) दिनांक----- महिना------- वर्ष----------
८. जन्म तारीख अक्षरात ----------------------------------------------------------------
९. **जाहिरातीच्या दिनांकास वय** वर्ष -------- महिने ------- दिवस -------
१०. राष्ट्रीयत्व ----------------------------------------------------------------
११. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय होय / नाही
१२. उमेदवार पुरुष अथवा स्त्री पुरुष / स्त्री
१३. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:-

| **अ.क्र.** | **शैक्षणिक अर्हता** | **संस्थेचे / मंडळाचे / विद्यापिठाचे नांव** | **प्राप्त गुणांची टक्केवारी** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी (१० वी) | | | |
| २ | एच.एस.सी (१२वी) | | | |
| ३ | | | | |
| ४ | संगणक प्रमाणपत्र/पदविका | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | सेवा योजन व इतर कार्यालयाचे नांव | नोंदणी क्रं. | दिनांक:- | |
| ६ | कामाचा अनुभव असल्यास | **कार्यालयाचे नांव:-**<br>**कालावधी:-** | **पदाचे नांव:-**<br>सध्या कार्यरत आहे काय:-<br>होय/नाही | **वेतन:-** |

असे प्रमाणित करतो/करते की, मी ---------------------------------------- या पदा करीता अर्ज केला असुन मी जाहीरात योग्य रितीने वाचली असून मला जाहीराती मधील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात आल्यास माझा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती अधिकारी जो निर्णय देईल तो मला मान्य राहील.

ठिकाण :-

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे संपूर्ण नांव-----------------

---

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना-अ**

**प्रतिज्ञापन नमुना अ - ( नियम ४ पहा)**

मी, श्री / श्रीमती / कुमारी **--------------------------------------------------**श्री **------------------------------** यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी, वय **------** वर्ष, राहणार **------------------------------------------------------** याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की, (१) मी **------------------------** पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला **------** ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या **--------** आहे. ( असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधिल राहील.**

**ठिकाण :-**

**दिनांक :-** **सही**

( उमेदवाराचे नांव **-------------------------------**)

**(टिप :- अविवाहीत असल्यास तसे नमुद करुन प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरीत करावी )**